|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र.कबचौ उमवि/१८/ 7th वेतन आयोग /431 /२०१९ दि. १५/०४/२०१९

**तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये -

विषय : सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीत संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन निश्चिती बाबत विद्यापीठात बैठकीबाबत ..

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. Misc 2018/CR 56/18/UNI-1 दि. ८ मार्च, २०१९
२. विद्यापीठ निदेश क्र. ४/२०१९ दि. २५.३.२०१९

महोदय,

महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू केला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी संदर्भ क्र. २ अन्वये निदेश क्र. ४/२०१९ दि. २५ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेला असून या निदेशान्वये विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करून संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयातील कलम १.० नुसार विद्यापीठाने वेतन निश्चिती करावयाची आहे. या संदर्भात मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मा. संचालक (उ.शि.) महाराष्ट्र राज्य, पुणे व सर्व विभागीय मा. सहसंचालक व उच्च शिक्षण विभागाच्या इतर अधिकाऱ्यांसमवेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि. ८.४.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच दि. १६ एप्रिल, २०१९ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आलेली सदर बैठकीतही यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

तरी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन निश्चितीचे कामकाज निश्चित वेळेत पारपाडण्याच्या दृष्टीने गुरूवार दि. १८ एप्रिल, २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. प्र-कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या अधिसभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरहू बैठकीत मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव हे मार्गदर्शन करणार आहेत.

तरी सदर बैठकीत आपण स्वतः आणि आपल्या अधिनस्त वेतननिश्चितीचे काम पहाणाऱ्या जाणकार कर्मचाऱ्या-सह विद्यापीठात स्व खर्चाने उपस्थित राहून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
(भ. भा. पाटील)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी
१. मा. कुलगुरु कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय,
३. मा. कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)

F:\dr.Vadnere\2019\External_letter2019 (Repaired).docx

Scanned by CamScanner